नोंदणीकृत कंत्राटदार/बेरोजगार अभियंता/मजूर सहकारी संस्था यामधील कामाच्या वाटपाबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शा.नि.क्र. सीएटी ०१/०५/प्र.क्र.२६/इमारती २
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक ३१ मार्च, २००५.

**वाचावे** - १) शा.नि.क्र.सीएटी १०९०/सीआर २१/इमा.२, दि. ३ फेब्रुवारी,१९९६
२) शा.नि. सीएटी १०९६/सीआर ३४८/इमारती २, दिनांक १७/१२/१९९६
३) शा.नि.क्र.सीएटी १०९७/सीआर ४२/इमा.२, दि.४ मार्च,१९९९
४) शा.नि.क्र.सीएटी १०९७/सीआर ४२/इमा.२, दि.२९ जुलै २००२.
५) शा.नि.क्र.सीएटी १०९७/सीआर ४२/इमा.२, दि.२५ ऑक्टोबर २००२.
६) शा.नि.क्र.सीएटी १०९७/सीआर ४२/इमा.२, दि.२० ऑक्टोबर २००३.
७) शा.नि.क्र. एलएबी १०९८/प्र.क्र. १६४/इमारती २, दिनांक ११ जानेवारी,२०००.

**प्रस्तावना** - शासन निर्णय दि. २० ऑक्टोबर २००३ अन्वये नोंदणी झाल्यानंतर ज्या स्थापत्य अभियंत्यांनी रु. ५.०० लक्षपर्यंतचे एक किंवा तेवढया किंमतीची दिलेले कामे यशस्वीपणे पूर्ण केली आहेत. त्यांना त्यापुढे रु. ३५.०० लक्षपर्यंतची तीन किंवा अधिक अशी एकुण रु. ४०.०० लक्ष किंमतीपर्यंतची कामे विनास्पर्धा देणेबाबतची सवलत दिलेली आहे. याकरीता बेरोजगार अभियंत्यांना काम वाटप करताना त्यांना कंत्राटदार नोंदणी वर्ग ६ साठीच्या मर्यादेपर्यंत म्हणजेच रु. १५.०० लक्ष किंमतीपर्यंतचे काम देण्यात येते. तसेच शासन निर्णय दिनांक ११ जानेवारी,२००० अन्वये मजूर सहकारी संस्थांना रु. ५.०० लक्ष किंमतीपर्यंतची कामे निविदा न मागविता वर्षभरात एकूण रु. ३०.०० लाख मर्यादेपर्यंत देता येतात. रु. ५.०० लक्षपर्यंतच्या कामाचे वाटप मजूर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंते या दोन्ही संवर्गामध्ये ५०:५० अशा प्रमाणात करण्याचे निदेश दिनांक ११ जानेवारी, २००० च्या शासन निर्णयान्वये दिलेले आहेत. तथापि, रु. ५.०० लक्षपर्यंतच्या कामांचे दोन्ही संवर्गामध्ये ५०:५० अशा प्रमाणात वाटप झाल्यामुळे शासन नोंदणीकृत वर्ग ९ व ८ या संवर्गात पंजीबध्द असलेल्या कंत्राटदारांना कामे उपलब्ध होत नाहीत. तसेच रु. १५.०० लक्षपर्यंतची कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना वाटप करण्यात येत असल्याने, वर्ग ७ व ६ या संवर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांना देखील पुरेशी कामे उपलब्ध होत नाहीत. नोंदणी नियमानुसार कंत्राटदारास वरच्या वर्गात नोंदणी पदोन्नत करावयाचे झाल्यास, त्यास खालच्या वर्गातील एक काम यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करुन तिन्ही संवर्गामध्ये कामाचे प्रमाणाबध्द वाटप करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** - यासंदर्भात शासनाने वर्ग ६ ते वर्ग ९ मधील नोंदणीकृत कंत्राटदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता, मजूर सहकारी संस्था या तीन्ही संवर्गामध्ये खालील टक्केवारीप्रमाणे कामाचे वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे :-

**१) रु. ५.०० लक्ष किंमतीपर्यंची कामे -**

| | |
|---|---|
| अ) पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार - | - ३४ टक्के |
| ब) सुशिक्षित बेरोजगार अभियंता | - ३३ टक्के |
| क) मजूर सहकारी संस्था | - ३३ टक्के |

सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजूर सहकारी संस्था यांना निविदा न मागविता प्रचलि पध्दतीनुसार कामे वाटप करण्यात यावीत. त्याचप्रमाणे नोंदणीकृत कंत्राटदारांकरीता जी का उपलब्ध होतील, अशा कामांच्या निविदा प्रक्रियेत सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजूर सहका संस्थासुध्दा सहभागी होऊ शकतील.

**२) रु. ५.०० ते १५.०० लक्ष किंमतीची कामे -**

| | |
|---|---|
| अ) पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार - | ६६ टक्के |
| ब) सुशिक्षित बेरोजगार अभियंता - | ३४ टक्के |

सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना निविदा न मागविता प्रचलित पध्दतीनुसार कामे वाट करण्यात यावीत. त्याचप्रमाणे नोंदणीकृत कंत्राटदारांकरीता जी कामे उपलब्ध होतील, अः कामांच्या निविदा प्रक्रियेत सुशिक्षित बेरोजगार अभियंतासुध्दा सहभागी होऊ शकतील.

२. विविध विभागांनी वाटप करावयाची कामे काम वाटप सभेच्या १४ दिवसांआधी संबंधि अधीक्षक अभियंत्यांना कळवावी. संबंधित अधीक्षक अभियंत्यांनी प्रत्येक विभागाकड् कळविण्यात आलेली कामांची यादी एकत्रित करुन काम वाटप सभेच्या सात दिवस अगो वेबसाईटवर ठेवावी. काम वाटप सभेत फक्त वेबसाईटवर प्रसिध्द केलेल्या कामांचेच काटेकोरप लॉटरी पध्दतीने वाटप करण्यात यावे. वेबसाईटवर प्रसिध्द न झालेल्या एकाही कामाचे वाट कोणत्याही परिस्थितीत करण्यात येऊ नये, याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

३. प्रत्येक सभेत सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना सर्वसाधारणपणे एकाच कामाचे वाट करण्यात येते. तथापि, इतर सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांची मागणी नसल्यास, एका सभे एका सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याला २ ते ३ कामांचे वाटप आर्थिक मर्यादेपर्यंत करण्यास हरक नाही.

४. काम वाटप करताना विशिष्ट सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याला काम देण्याबाब विभागाकडून, इतर कोणत्याही व्यक्तीकडून तोंडी किंवा लेखी प्राप्त झालेल्या शिफारशीचा विच करु नये. काम वाटप फक्त लॉटरी पध्दतीनेच करण्यात यावे.

५. काम वाटप बैठकीत काम वाटप समितीचे अध्यक्ष, समिती सदस्य व काम घेण्यास इच्छू सुशिक्षित बेरोजगार अभियंता उपस्थित राहतील. इतरांना बैठकीत मज्जाव करण्यात यावा.

६. वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. शासनाच्या नजरेस सुचनांचे पालन होत नाही असे आढळून आल्यास, काम वाटप समितीचे अध्यक्ष व शासकीय सदस्य शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र उरतील, याची नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( भा. आं. गांगुर्डे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. मुख्यमंत्री, ह्यांचे प्रधान सचिव,
मा. मंत्री (सा.बां.)/जलसंपदा ह्यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री (सा.बां.)/ जलसंपदा ह्यांचे खाजगी सचिव,
वित्त विभाग/सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर,
महालेखापाल, लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
सचिव (बांधकाम)/ सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, ह्यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक,
जलसंपदा विभाग, मंत्रालय,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,

प्रत, माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी,

सर्व मुख्य अभियंते, सा.बां.विभाग/ जलसंपदा विभाग,
मुख्य अभियंता, बृहन्मुंबई क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई, महाराष्ट्र,
गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा), मुंबई,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (सिडको), निर्मल बिल्डीग, नरीमन पॉईंट, मुंबई/महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई,
जलसंपदा विकास महामंडळ, कृष्णा/तापी/गोदावरी/विदर्भ,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई,
आयुक्त, सर्व महानगरपालिका (२ प्रतींसह),
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषदा,
सर्व अधीक्षक अभियंते, सा.बां.विभाग/ जलसंपदा विभाग,
अधीक्षक अभियंता, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी, मुंबई/महानगरपालिका,ठाणे/पुणे/कल्याण,
संचालक, उपवने आणि उद्याने, मुंबई,
प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी,
सर्व कार्यकारी अभियंते,सा.बां.विभाग/ जलसंपदा विभाग/जिल्हापरिषद,
सर्व अधिकारी/कार्यासन अधिकारी,सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग, मंत्रालय,
कार्यासन इमारती-२ (निवड नस्ती).